• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४२ • गुरुवार, दि. १४ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रुपये

• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 342 • Thursday 14 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## बीडच्या धार्मिक विकासासाठी 5 कोटींचा निधी -कुंडलिक खांडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या श्री क्षेत्र पेंडगाव येथील हनुमान मंदिर आणि म्हाळस जवळा येथील श्री मोहिनीराज मंदिर देवस्थानच्या वैभवात लवकरच भर पडणार आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. पेंडगाव देवस्थानसाठी १ कोटी रु.तर श्री मोहिनीराज देवस्थानच्या विकास कामांसाठी ४ कोटी रु.चा निधी मंजुर झाला असून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने या संदर्भातील शासन आदेश जाहिर केला आहे. या विकास



कामांना मंजुरी दिल्याबद्दल जिल्हाप्रमुख खांडे यांनी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, कृषीमंत्री धनंजय मुंडे, ना.गिरीश महाजन, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे ,खा.प्रितमताई मुंडे यांचे आभार व्यक्त केले आहेत. बीड शहराच्या जवळ असणार्या धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या श्री क्षेत्र पेंडगाव येथील श्री हनुमान मंदिर व म्हाळस जवळा येथील श्री मोहिनीराज या देवस्थानांचे हजारो भाविक बीड जिल्ह्यासह संपुर्ण राज्यभरात आहेत. जागृत व नवसाला पावणारा देव म्हणून पेंडगावच्या हनुमान मंदिराची ख्याती आहे. या देवस्थानसाठी १ कोटी रु.विकास निधी जाहिर झाला असून श्री. मोहिनीराज देवतेचे संपुर्ण देशात केवळ दोनच ठिकाणी मंदिरे आहेत. त्यापैकी एक असलेल्या म्हाळस जवळा येथील मंदिराच्या विकाससाठी ४ कोटी रु.निधी मंजुर झाला आहे.दि.११ मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या या शासन निर्णयात मंदिराच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेक्षिक पर्यटन योजने अतंर्गत सन २०२३-२४ मध्ये या दोन देवस्थानांचा समावेश करण्यात आला आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांचे बीड विधानससभा मतदारसंघातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या मंदिरांच्या ठिकाणी विकासकामे व्हावीत यासाठी विशेष लक्ष आहे. दोन्ही देवस्थानच्या या विकास कामांना भरभरुन निधी दिल्याबद्दल जिल्हाप्रमुख खांडे यांनी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, कृषीमंत्री धनंजय मुंडे, ना.गिरीश महाजन, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे,खा.प्रितमताई मुंडे यांचे आभार व्यक्त करत सदरील विकासकामे दर्जेदार पध्दतीने होतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

## गेवराई - जातेगाव ते सेलू सिमेंट कॉंक्रिट रस्ता कामासाठी २८३ कोटी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदार संघातील गेवराई (रा म मा २२२) ते जातेगाव - सेलु व जातेगाव ते रा म मा ६१ (माजलगाव



रोड) या ०७ मीटर रुंदीच्या सिमेंट कॉंक्रेट रस्त्याच्या कामासाठी हॅब्रीड न्यूटी अंतर्गत २८३ कोटी रुपये मंजूर झाले असून सदर कामाची निविदा सूचना (टेंडर नोटीस) प्रसिद्ध झाली.त्यानंतर आमदार लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात अशी भावना व्यक्त केली की जनतेने माझ्यावर २०१४ ला जो विश्वास टाकला त्या विश्वासास मी कुठेतरी पात्र ठरतोय, म्हणून ज्या वेळेस मी आरशासमोर उभा राहतो त्यावेळेस मला स्वतःच्या नजरेत पडण्याची कधीच वेळ आली नाही. कारण मी सत्तेचा उपयोग स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी न करता ज्या मतदारांनी माझ्यावर विश्वास टाकला त्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी केला आहे. पत्रकात आमदार पवार पुढे म्हणाले की चकलांबा ते गेवराई रस्त्याचे काम हॅब्रीड न्यूटी अंतर्गत सुरू आहे. त्याच रस्त्याची शिल्लक राहिलेली लांबी गेवराई - जातेगाव माजलगाव रोड या रस्त्याच्या कामाला देखील हॅब्रीड न्यूटी अंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध व्हावा अशी माझी इच्छा होती.महाराष्ट्रातील निष्क्रिय आघाडी सरकार गेल्यानंतर महाराष्ट्रात पुन्हा युती सरकार सत्तेवर आल. युती सरकार सत्तेवर येताच मी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्रजी चव्हाण यांच्याकडे या कामासाठी सतत पाठपुरावा केला. आज त्या पाठपुराव्याला मोठ यश प्राप्त झाल आहे.लवकरच सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईल व ०७ मीटर रुंदीचा अत्यंत दर्जेदार सिमेंट कॉंक्रेट चा रस्ता मतदारसंघातील जनतेसाठी उपलब्ध होईल. येणाऱ्या काळात लवकरच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून मतदार संघात सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मतदार संघात प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामासाठी देखील मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. आर डी एस एस योजनेच्या माध्यमातून नवीन ३३ केव्ही केंद्र उभारणीसाठी देखील मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. पी एम श्री योजना व आदर्श शाळा विकास योजने अंतर्गत मतदार संघातील शाळांच्या विकासासाठी देखील येणाऱ्या काळात मोठा निधी उपलब्ध होणार आहे. तसेच लवकरच पैठण उजव्या कालव्याचे देखील नूतनीकरणाचे काम सुरू होणार आहे. मृदा व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून मतदार संघात नदी नाल्यांवर मोठ मोठे बंधारे निर्माण करून पाणी अडवण्यावर देखील भर दिला जाणार आहे. मराठवाडा वॉटर ग्रीडच्या कामाला गती मिळावी यासाठी देखील युती सरकार कटिबद्ध असून मी त्याबाबत सतत पाठपुरावा करत आहे.या माध्यमातून मतदार संघातील जनतेला उत्तम दळणवळणाच्या सुविधा, उत्तम आरोग्याच्या सुविधा, मुलांना दर्जेदार शिक्षणाची सुविधा, शेतीसाठी व पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता व सुरळीत विद्युत पुरवठा उपलब्ध करून देणे हाच मनाशी ध्यास असून हेच उद्दिष्ट घेऊन मी राजकारणात काम करत आहे. सत्तेचा उपयोग केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी करणाऱ्या आपल्या राजकीय विरोधकांना आपल्या राजकीय शैलीत आमदार पवार यांनी टोला लगावला.

## भाजपाकडून पंकजा मुंडे यांना बीड लोकसभेची उमेदवारी



**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने दुसरी यादी जारी केली आहे. दुसऱ्या यादीत महाराष्ट्रातील मोठ्या नावांचा समावेश आहे. यामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, बीडमधून पंकजा मुंडे, रावेरमधून रक्षा खडसे, नंदुरबारमधून हिना गावित, धुळे सुभाष भामरे, चंद्रपूरमधून सुधीर मुनगंटीवार यांची नावं आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या यादीकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. आजच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील एकूण २० उमेदवारांचा समावेश आहे. नितीन गडकरी यांना नागपूर, नगरमधून सुजय-विखे पाटील, माढामधून रणजीत निंबाळकर, बीडमधून पंकजा मुंडे, रावेरमधून रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भाजपने महाराष्ट्रातील दिग्गजांची नावं जाहीर केली

## धार्मिक स्थळांसाठी २ कोटी ६० लाखांचा निधी -माजी मंत्री जयदत्त अण्णा


**बीड । प्रतिनिधी**

तिर्थक्षेत्र विकास कामाच्या अंतर्गत बीड शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठान साठी १ कोटी तर हजरत मन्सूर शहावली दर्गा यांच्या विकास



कामांसाठी १ कोटीच्या निधीला मंजुरी मिळाली आहे, तर अंजनवती येथील संत तुकावीप्र संस्थान साठी ६० लाखाचा निधी मंजूर झाला आहे. संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या ट्रस्टीनी, तुकावीप्र संस्थानने आणि मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक भाविकांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केलेल्या प्रयत्नाबाबत आनंद व्यक्त केला आहे. बीड शहरात असलेल्या दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांसाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून दोन कोटी ६५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. बार्शी रोड येथील संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान हे अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते. गेल्या ३० वर्षापासून या ठिकाणी मंदिर ट्रस्टच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित केले जातात मात्र या ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत होत्या. या ठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणात अखंड हरिनाम सप्ताहाचा कार्यक्रम होत असतो या सप्ताह प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती दरवर्षी असते. मंदिर संस्थानच्या वतीने माजी मंत्री क्षीरसागर यांच्याकडे पर्यटन विकास अंतर्गत निधी उपलब्ध व्हावा यासाठी सातत्याने मागणी केली जात होती. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सातत्याने पाठपुरावा करून या प्रतिष्ठान साठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. ज्यामध्ये भव्य भक्तनिवास आणि इतर पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. दि.१३ रोजी निधी मंजूर झाल्याची माहिती मिळताच संत भगवान बाबा यांच्या भक्तांमध्ये आनंद व्यक्त केला जात होता, माजी मंत्री क्षीरसागर यांनी वेळोवेळी मंदिर ट्रस्टला सहकार्य केले आहे अशी भावना भक्तांनी बोलून दाखवली, तसेच बीड तालुक्यातील संत तुकाविप्र संस्थांसाठी देखील ६० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. १८ व्या शतकातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ महाराज यांच्या परंपरेतील एक महान संत तुकाविप्र होते त्यांनी संत नामदेवांच्या शतकोटी अभंगाचा निर्धार केला होता एक लाख ७५ हजार अभंग लिहून त्यांनी पूर्ण केले आहेत. संत तुकाविप्र संस्थांचे राज्यात पाच देवस्थाने आहेत. गेल्या २३२ वर्षापासून अंजनवती येथे त्यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात पार पाडला जातो. याच बरोबर बीड शहरातील हजरत मन्सूर शहा हे सुफी संत होते. ते ग्वालियरच्या सिंधिया घराण्याचे गुरू आहेत, यापूर्वी या दर्ग्याला राजमाता सिंधिया दोन वेळा येऊन गेल्या व माधवराव सिंधिया हे देखील येऊन गेले. हे धार्मिक स्थळ हिंदू, मुस्लिम समाजातील एकात्मतेचे प्रतीक आहे, त्यामुळे या परिसराचा विकास व्हावा यासाठी बीड शहरातील मुस्लिम समाजातील अनेक भाविकांनी विकास कामांसाठी निधीची मागणी माजी मंत्री क्षीरसागर यांच्याकडे सातत्याने केली होती. याबाबत ४ जुलै २०१९ ला जिल्हाधिकारी यांच्या मार्फत प्रस्तावही दाखल करण्यात आला होता. आता मंजूर निधीतून संरक्षण भिंत व पायाभूत सुविधा अशी कामे होणार आहेत. तर अंजनवती येथील संत तुकावीप्र संस्थान साठी ६० लाख मंजूर झाले आहेत. माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी या तीनही कामांसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे आग्रही मागणी करताच दोन्ही धार्मिक स्थळांसाठी दोन कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे तीनही धार्मिक स्थळाच्या ट्रस्टींनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे आभार व्यक्त केले आहे. यापूर्वीच शहरातील ग्रामदैवत श्री खंडेश्वरी देवस्थान साठी ४ कोटी व गोरक्षनाथ टेकडीच्या विकासासाठी १ कोटी ३० लाख निधी माजी मंत्री क्षीरसागर यांनी मंजूर करून आणला आहे.

## नागरिकत्व दुरुस्ती कायदा कधीही मागे घेतला जाणार नाही'



नवी दिल्ली - आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारने नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) लागू केला आहे. देशभरात सोमवार, ११ मार्च पासून नागरिकत्व सुधारणा कायदा अर्थात - कायदा लागू झाला. याचं नोटिफिकेशन केंद्र सरकारनं काढलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गेल्या महिन्यात सांगितले होते की, लोकसभा निवडणुकीपूर्वी सीएए लागू करणार आहे. आता यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ठामपणे सांगितले आहे की, हा कायदा कधीही मागे घेतला जाणार नाही. एएनआयला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे वक्तव्य केले आहे. सीएए कायदा कधीही मागे घेतला जाणार नाही. आपल्या देशात भारतीय नागरिकत्व सुनिश्चित करण्याचा हा आमचा सार्वभौम निर्णय आहे आणि आम्ही त्यात कधीही तडजोड करणार नाही, असं अमित शाह यांनी एएनआयला दिलेल्या मुलाखतीत ठणकावून सांगितले आहे. तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीवर बोलताना अमित शाह म्हणाले की, 'अल्पसंख्याकांना किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला घाबरण्याची गरज नाही कारण सीएएमध्ये कोणाचेही नागरिकत्व काढून घेण्याची तरतूद नाही. सीएए फक्त अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन आणि पारसी निर्वासितांना हक्क आणि नागरिकत्व देण्यासाठी आहे, असं अमित शाह यांनी स्पष्ट केलं आहे. यावेळी अमित शाह यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. विरोधक फक्त सांगतात पण करत काहीच नाही. कलम ३७० रद्द करणे हे देखील आमच्या राजकीय फायद्यासाठी होते, असेही ते म्हणाले होते. असदुद्दीन ओवेसी, राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, ममता बॅनर्जी यांच्यासह सर्व विरोधी पक्ष खोट्याचे राजकारण करत आहेत, अशी घाणाघाती टीका अमित शाह यांनी केली. भाजपाने २०१९ मध्ये आपल्या जाहीरनाम्यात म्हटले होते की ते सीएए लागू करतील. २०१९ मध्येचं तो संसदेने मंजूर केला होता पण कोविडमुळे विलंब झाला. विरोधकांना तुष्टीकरणाचे राजकारण करायचे आहे आणि त्यांची व्होट बँक मजबूत करायची आहे. त्यांचा पर्दाफार्श झालेला आहे. देशातील लोकांना माहित आहे की सीएए हा या देशाचा कायदा आहे.


## भावार्थ रामायण कथेचे आयोजन

बीड - गेवराई तालुक्यातील माळवहिवरा येथे सालाबादप्रमाणे आयोजित केल्या जाणार्या अखंड हरिनाम सप्तहाची यंदा तपपूर्ती आहे. या निमित्त ह.भ.प.केशव महाराज कुलकर्णी (परभणी केसापूरी यांच्या मुखद वाणीतून श्री भावार्थ रामायण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. ही भावार्थ रामायण कथा आज दि.१४ मार्च रोजी प्रारंभ होईल. येत्या २० मार्च पर्यंत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत ही रामायण कथा संपन्न होणार असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा सहकुटूंब उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन माळहिवरा येथील समस्य गावकरी मंडळींनी केले आहे.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत पाच हजार लाभार्थ्यांना मंजुरी

मुंबई - सौर ऊर्जा निर्मितीचा वापर करून तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देण्यासाठीच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत राज्यातील पाच हजार वीज ग्राहकांना एकाच वेळी मंजुरीचे संदेश मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी पाठविण्यात आले. मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू केली आहे. या योजनेचा आज राज्यात मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या शुभ हस्ते शुभारंभ करण्यात आला.

## चुलत बहिणीवर भावाकडून अत्याचार



जळगाव - काकाकडे राहणाऱ्या पुतण्याने गेल्या चार महिन्यांपासून घरी कोणीही नसल्याचा फायदा घेत चक्क स्वत:च्या चुलत बहिणीवरच अत्याचार केल्याची घटना घडली आहे. बहिण भावाच्या नात्याला काळीमा फसणारी घटना सोमवार दि. ११ रोजी उघडकीस आली. याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात संशयिताविरुद्ध पोक्सोतंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर आरोपीला अटक करण्यात आली आहे. यावरुन पुन्हा अल्पवयीन मुलांमध्ये 'गुड टच, बॅड टच' बाबत मुलांना लगेचच बोलते करण्याचा मुद्दा अधोरेखित होत आहे. शहरातील एका परिसरात १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी तिच्या कुटुंबियांसह वास्तव्यास असून ही अल्पवयीन मुलगी इयत्ता आठवीच्या वर्गात शिकत आहे. त्यांच्यासोबत तिच्या घरी काकांचा मुलगा देखील राहत आहे. मुलीचे कुटुंबिय घरी नसतांना मुलीचा चुलत भाऊ हा तिच्यावर अत्याचार करीत होता. सतत गेल्या चार महिन्यांपासून तो मुलीवर अत्याचार करीत होता. त्यानंतर तो बहिणीला मारहाणही करीत असे. असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी समुपदेशकांनी पोलीसात दिलेल्या तक्रारीवरुन शनिपेठ पोलिसात पोक्सोकायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रिया दातीर करीत आहेत.

## अनेकजण भाजपामध्ये येण्याच्या तयारीत



मुंबई : राज्यासह देशात सर्वच राजकीय पक्षांनी सध्या आगामी लोकसभा निवडणुकीची तयार सुरू केली आहे. या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठी गळती लागली आहे. मुंबईत माजी खासदार मिलिंद देवरा आणि माजी आमदार बाबा सिद्धीकी यांनी आधीच पक्षाला रामराम ठोकला आहे. मिलिंद देवरा यांनी शिवसेनेत तर बाबा सिद्धिकी यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. तर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी देखील भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसेच, काँग्रेसचे माजी आमदार पद्माकर वळवी यांनीही आज काँग्रेसला रामराम ठोकत भाजपामध्ये प्रवेश केला. याच पार्श्वभूमीवर अशोक चव्हाण यांनी भाष्य केले आहे. जे लोक काँग्रेसमध्ये आहेत, त्यांना त्यांचे भविष्य दिसत नाही. सध्याची परिस्थिती पाहाता त्याठिकाणी अस्वस्थता आहे. भाजपा राष्ट्रीय स्तरावर वाढणारी पार्टी आहे. भाजपामध्ये काम करण्याची संधी आहे. देशाचे भविष्य आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोंदीचे नेतृत्व महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे अनेकजण भाजपामध्ये येण्याच्या तयारीत आहेत. निवडणुका जवळ आल्याने आणखी बरेच लोक भाजपमाध्ये प्रवेश करणार आहेत, असे अशोक चव्हाण म्हणाले. याशिवाय, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकमध्ये सीएए कायद्याला विरोध होत आहे. यावर बोलताना अशोक चव्हाण म्हणाले, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकातील सरकारे अडथळे निर्माण करतील हे स्वाभाविक आहे.

## निवडणुकीत येणार धक्कादायक निकाल?

मुंबई - लोकसभा निवडणूक कोणत्याहीक्षणी लागण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत भाजपप्रणित एनडीए आणि इंडिया आघाडी यांच्यात थेट लढत होणार आहे. तत्पुर्वी एक धक्कादायक सर्वे समोर आला आहे. या सर्वेक्षणात भाजपप्रणित एनडीएला मोठा धक्का बसला आहे. तर इंडिया आघाडीला काहीसा दिलासा मिळालाय. त्यामुळे नेमक्या सर्वेत काय आहे? हे जाणून घेऊयात. सकाळ मीडिया ग्रुपच्या वतीने एक सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात देशातील कोणत्या पक्षाला, किती लोकांची पसंती आहे. या संदर्भातला सर्वे केला गेला आहे. या सर्वेनुसार भाजपप्रणित एनडीएला ४३. ३ टक्के लोकांची पसंती दर्शवली आहे. तर विरोधकांच्या इंडिया आघाडीला ४५.७ टक्के लोकांनी पसंती मिळाली आहे.तसेच देशभरातील इतर पक्षांना म्हणजेच अपक्षांना ३.७ टक्के लोकांनी पसंती दिली आहेत. तर १०. ३ टक्के लोकांनी कोणत्याच पक्षाला निवडले नाही आहे. एकूणच या सर्वेक्षणातून भाजपला मोठा धक्का बसताना दिसतो आहे. कारण एऩडीएला ४३. ३ टक्के लोकांचीच पसंती आहे. तर विरोधकांच्या इंडिया आघाडीला आणि महाविकास आघाडीला ४५.७ टक्के टक्के लोकांनी पसंती दर्शवली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीला मोठा दिलासा मिळताना दिसतो आहे. जनतेने दिलेला कौल पाहता आगामी निवडणुकीत दोन्ही पक्षांमध्ये तगडी फाईट होण्याची शक्यता आहे.

# धार्मिक स्थळांच्या सर्वांगिण विकासासाठी शक्तिपीठ महामार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात

**नागपूर । वृत्तसेवा**

राज्यातील शक्तिपीठ धार्मिक स्थळांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच पर्यटनांच्या दृष्टिने शक्तिपीठ महामार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होत आहे. हा मार्ग पत्रादेवी-बांदा (ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) ते दिगरज (जि. वर्धा) असा एकूण ८०५ किलोमीटरचा आहे. या महामार्गावरील २६ ठिकाणी इंटरचेंज असणार आहे. यासह ४८ मोठे पूल, ३० बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग प्रास्ताविक आहेत. हा शक्तिपीठ महामार्ग उभारण्यासाठी हजारो कोटी रुपयांचा खर्च होणार असून १२ जिल्ह्यातील २७ हजार ५०० एकराची जमीन यात हस्तंगत होणार आहे. १२ जिल्हयातील १२ हजार ५८९ इतक्या गट नंबरमधील २७ हजार ५०० एकरातून हा महामार्ग जाणार आहे. या सुपर एक्स्प्रेसवेसाठी राज्य सरकार हजारो हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. राष्ट्रीय महामार्ग रिअल इस्टेट कायद्यांतर्गत ही जमीन संपादित केली जात आहे. शक्तीपीठ महामार्ग उभारणीसाठी राज्य सरकार ८६ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या महामार्गाचे भूमिपूजन २०२५ मध्ये होणार असून २०३० मध्ये तो सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात येणार आहे. सध्या नागपूरहून गोव्याला जाण्यासाठी रस्त्याने १८ तास लागतात, मात्र शक्तीपीठ महामार्गाच्या निर्मितीनंतर हा प्रवास केवळ आठ तासांवर येणार आहे. हा मार्ग राज्यातील तीन शक्तीपीठांना जोडणार असल्याने या महामार्गाला शक्तीपीठ महामार्ग असे संबोधण्यात येणार आहे. हा मार्ग महाराष्ट्रातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून जाणार आहे. हा महामार्ग सहापदरी असणार आहे. महामार्गावरील २६ ठिकाणी इंटरचेंज असणार आहे. यासह ४८ मोठे पूल, ३० बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग असणार आहेत. हा महामार्ग कोल्हापूरची करवीर निवासिनी अंबाबाई देवी, तुळजापूरची तुळजाभवानी आणि नांदेडमधील माहूरची रेणुकादेवी अशी तीन शक्तीपीठे जोडणार आहे. हा मार्ग औंढा नागनाथ आणि परळी वैजनाथ या दोन ज्योतिर्लिंग मंदिरांनाही जोडेल. पंढरपूरचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नांदेडमधील गुरु गोविंदसिंग महाराजांचे गुरुद्वारा, सोलापूरचे सिद्धरामेश्वर मंदिर, सांगलीतील औदुंबर, कोल्हापूरमधील नृसिंहवाडी, पट्टणकोडोली, सांगवडे, कणेरी, आदमापूर यासह तीर्थक्षेत्राना जोडण्यात येणार आहे.

## कार्यरत शिक्षकांना बदलीची संधी

**नागपूर । वृत्तसेवा**



पवित्र पोर्टलद्वारे नवीन भरती प्रक्रिया राबविण्यापूर्वी सध्या कार्यरत शिक्षकांना बदलीची संधी मिळावी, अशी राज्यातील शिक्षकांची मागणी पूर्ण झाल्याने राज्यभरात आनंदाचे वातावरण आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या माध्यमातून यश मिळाले असून ग्रामविकास विभागाने स्वतंत्र आदेश निर्गमित केल्याने राज्यातील शिक्षकांच्या जिव्हाळ्याची मागणी पुर्णत्वास गेली आहे. नजिकच्या काळात बदल्यांचा मार्ग सुकर झाल्याची माहिती शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली. राज्यातील प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरली जावीत यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने दीर्घकाळ पाठपुरावा करीत शिक्षक भरती प्रक्रियेला चालना दिली होती. दरम्यान, शिक्षक बदल्यांच्या धोरणाचा शासन स्तरावर फेरविचार सुरु झाल्याने शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे सरचिटणीस राजन कोरगांवकर, कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील यांनी नवनियुक्त शिक्षकांना पदस्थापना देण्यापूर्वी कार्यरत शिक्षकांना बदलीची संधी मिळावी यासाठी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे पाठपुरावा केल्याने २१ जून २०२३ रोजी शालेय शिक्षण विभागाने बदल्यांसाठी आदेश पारीत केला होता. मात्र जिल्हा परिषद शिक्षक बदल्यांचे अधिकार ग्रामविकास मंत्रालयाच्या अधिकार क्षेत्रात येतात. त्यामुळे गेल्या आठवड्यात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या राज्य पदाधिकाऱ्यांनी याबाबत मंत्रालय स्तरावर ग्रामविकास विभागाकडून स्वतंत्र आदेश निघावा यासाठी पाठपुरावा केला होता. अखेर गिरीश महाजन यांच्या विभागामार्फत याविषयीचा आदेश निघाला आहे.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना महायुतीत?

**पुणे । वृत्तसेवा**

भाजप- शिवसेना - राष्ट्रवादीतील लोकसभा निवडणुकीच्या जागांचा तिढा सुटला नसला, तरी महाराष्ट्र नवर्निमाण सेना महायुतीत सहभागी होण्याची दाट शक्यता आहे. शिवसेनेच्या कोट्यातील दोन जागा मनसेला देण्याची तयारी एकनाथ शिंदे यांनी दर्शविली आहे. लोकसभा निवडणुकीत मनसेसोबत राहिल्यास विधानसभा निवडणुकीत शिवसेनेसाठी एकनाथ शिंदेंना मनसेची मदत होणार आहे. त्यासाठी मनसेला थेट महायुतीत न घेता शिवसेनेच्या दोन जागा देण्याबाबत चर्चा सुरू आहे. याबाबत मुंबईत महत्त्वाची बैठक होणार आहे. यात मनसेच्या सहभागाबाबत अंतिम निर्णय होण्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. मात्र, या दोन जागा कोणत्या असतील हे सांगण्यास सूत्रांकडून नकार देण्यात आला. लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होणार आहे. यात महायुतीचा ८० टक्के जागा वाटपाच तिढा सुटलेला आहे. राज्यातील ४८ जागांमध्ये राष्ट्रवादीला ३ तर शिवसेनेला १३ जागा आणि भाजप ३२ जागांवर लढण्याचा तोडगा निघाल्याची चर्चा आहे. मात्र, शिवसेनेला ११ जागा देण्यावर भाजप ठाम आहे. मात्र, मनसेसोबत आल्यास विधानसभा निवडणुकीत फायदाच होणार असल्याने मनसेचा महायुतीत थेट समावेश न करता मागच्या दाराने एकनाथ शिंदे हे मनसेला सोबत घेण्याची चर्चा आहे.

# गडकरीजी तुमचं नशीब मोदींच्या हातात नसून तुमच्या हातात -ठाकरे

**नागपूर । वृत्तसेवा**






राज्यात आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये चांगलीच स्पर्धा होत असल्याचे दिसतंय. त्यातच भाजपने लोकसभेच्या उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली. यात अनेक ज्येष्ठ नेत्यांचा समावेश नाही. त्यावरून ठाकरे गटाने भाजपवर टीका केली होती. खासकरून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नावावरून निशाणा साधला होता. त्यात आता पुन्हा एकदा ठाकरे गटाकडून भाजपवर निशाणा साधण्यात आलाय. उद्धव ठाकरे हे यवतमाळ दौऱ्यावर असताना त्यांनी भाजपवर सडकून टीका केली. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी, आगामी लोकसभा निवडणूक आमचेच सरकार येणार आहे. त्या सरकारमध्ये आम्ही तुम्हाला मंत्रीपद देऊ, असेही उद्धव ठाकरे यांनी सांगितले. आताच्या सरकारमध्ये तुम्हाला केवळ मंत्रिपदाची खूर्ची दिली गेली होती. तर आमच्या सरकारमध्ये तुम्हाला अधिकारासह मंत्रिपदाची खूर्ची देतो. पण तुम्ही महाराष्ट्राचे पाणी काय असतं ते दाखवून द्या. मोदींसमोर झुकण्याची गरज नाही. तुमचं नशीब मोदींच्या हातात नसून तुमच्या हातात मोदींचं नशीब आहे, असे विधान उद्धव ठाकरे यांनी केले. पुढे उद्धव ठाकरे यांनी वाशिम-यवतमाळच्या खासदार भावना गवळी आणि मंत्री संजय राठोड यांचाही समाचार घेतला. इथल्या खासदारावर भाजपाने भ्रष्टाचाराने आरोप केले होते. मग त्यानंतर विकासासाठी खासदार महिला भाजपामध्ये गेल्या . त्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना राखी बांधली. भ्रष्टाचाराच्या कारवाईपासून वाचविण्यासाठी मोदी गॅरंटी दिली गेली, असे म्हणत खोचक टीका त्यांनी केली. पुढे भाजपामध्ये पाच-पंचवीस कोटींच्या भ्रष्टाचाऱ्यांना किंमत नाही. तिथे ७० हजार कोटींचा घोटाळा करणाऱ्यांना थेट उपमुख्यमंत्रीपद दिलं जातं, असे म्हणत अजित पवारांवर टीका केली. भाजपानेच अजित पवार यांच्यावर ७० कोटींच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप केले होते. चार दिवसांत अजित पवार उडी मारून भाजपाबरोबर गेले आणि त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात आलं. विचार करा ७० हजार कोटींचा घोटाळा केलेला माणूस उपमुख्यमंत्री होत असेल तर मुख्यमंत्र्यांची किंमत काय असेल? असाही सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

## लोकसभा निवडणुकीत संभाजीनगरमध्ये मातब्बरांमध्ये लढाई होणार







**संभाजीनगर । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आहेत. अशात इच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. दरम्यान, मराठवाड्याची राजधानी असलेल्या संभाजीनगरमधून देखील अशीच काही परिस्थिती आहे. तर, संभाजीनगर लोकसभेत शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढाई होणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. भाजपने दावा केला असला तरीही महायुतीत संभाजीनगर लोकसभेची जागा महायुतीत शिवसेनेकडेच असणार असल्याचे बोलले जात आहे. तर, महाविकास आघाडीत देखील ठाकरे गटाचा उमेदवार असणार आहे. त्यामुळे मतदारसंघात शिवसेना विरुद्ध शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे असा सामना रंगणार असल्याची चर्चा आहे. संभाजीनगरची लोकसभा जागा लढवण्यासाठी इच्छुकांनी यादी मोठी आहे. मात्र, यात काही प्रमुख नेत्यांची नावं सर्वाधिक चर्चेत आहेत. शिंदे गटाकडून विनोद पाटील, संदिपान भुमरे, राजेंद्र जंजाळ इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. ठाकरे गटाकडून चंद्रकांत खैरे, विधानपरिषदेचे विरोध पक्षनेते अंबादास दानवे इच्छुक आहेत. त्यामुळे शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना झाल्यास वरीलपैकी कोणत्या नेत्यांना उमेदवारी मिळणार हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे.

## महाराष्ट्रातून आणखीन १२ उमेदवार निवडणूक रिंगणात

**मुंबई । वृत्तसेवा**



भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने शिक्कामोर्तब केलेली लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी आज रात्री जाहीर होण्याची शक्यता आहे. यामध्ये १२ ते १३ नावं महाराष्ट्रातील असण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मुंबईतून पाचही नव्या चेहऱ्यांना भाजप संधी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजप भाकरी फिरवून गोपाळ शेट्टी, मनोज कोटक आणि पूनम महाजन या तिन्ही विद्यमान खासदारांची तिकिटं कापण्याची चर्चा आहे. भाजप मुंबईतील सहापैकी पाच जागा लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. आतापर्यंत युतीत लढताना भाजप-शिवसेना मुंबईत समसमान तीन-तीन जागा लढवत असे. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपचे प्रत्येकी तीन खासदार निवडून आले. त्यापैकी शिवसेनेचे दोघे खासदार एकनाथ शिंदेंसोबत आले. त्यामुळे विद्यमानांना पुन्हा संधी देण्याच्या शब्दानुसार शिंदेंना मुंबईत किमान दोन जागा मिळणे अपेक्षित होते. परंतु युतीत शिवसेनेकडे असलेले ठाणे आताचे खासदार ठाकरे गटात असल्यामुळे भाजपने स्वतःकडे घेतलं होतं. परंतु डीलनुसार ठाण्यातील जागेच्या मोबदल्यात भाजपने उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघ आपल्याकडे वळला आहे, तर ठाणे मुख्यमंत्र्यांना देण्यात आलं आहे.

## शशिकांत सावंत पुरस्काराने सन्मानित



बीड - बीड जिल्हा न्यायालयातील सुप्रसिद्ध कायदेतज्ञ ड शशिकांत सावंत यांना व महाराष्ट्रतील विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणारे व्यक्तीमत्व यांचा दै. दिव्य मराठी यांच्या वतीने दिनांक ११ मार्च २०२४ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे हॉटेल फर्न रेसीडेंन्सि येथे दै. दिव्य मराठी यांच्या वतीने चर्चेतील चेहरे या पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले, कार्यक्रम सोहळास केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांच्या हस्ते व निशित जैन दिव्य मराठी चे चार राज्य प्रमुख यांच्या उपस्थितीत चर्चेतील चेहरे या पुरस्कार ने महाराष्ट्र तील प्रतिष्ठित व्यक्ती यांना सन्मानीत करण्यात आले, या वेळी बीड जिल्हातुन ड शशिकांत सावंत यांना या कार्यक्रम प्रसंगी बीड जिल्हातील कायदेतज्ञ चर्चेतील चेहरा हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, हा सन्मान सोहळा छत्रपती संभाजी नगर येथे हॉटेल फर्न रेसीडेंन्सि येथे पार पड़ला, या वेळी ड शशिकांत सावंत यांनी मनोगत व्यक्त करताना मनाले, या पुरस्कार चे नाव चर्चेतील चेहरा असे आहे, पण हा पुरस्कार तेव्हाच भेटला जेव्हा समाजात चांगले काम केले, करत राहिलो व कायम करत राहिल या कार्याची दखल मूळ सामाजिक चर्चा च्या माध्यमातुन आपली या चर्चेतील चेहरा पुरस्कार साठी निवड झाली. याचा मनातून आनंद वाटतो, या पुरस्कार मुळ सामाजिक काम करत असताना जात - पात, धर्म न पाहता सतत आणखी सामजिक काम करण्याची ऊर्जा येईल , व गोर गरीबांना, गरजू ना, निस्वार्थ मदत करण्याची प्रेरणा, भेटल आणखी चांगले काम करण्याची ऊर्जा येईल. असे प्रतीपादन ड सावंत यांनी व्यक्त केले.

## १७ मार्च रोजी न्यायालयाच्या नूतन इमारतीचा उद्घाटन समारंभ

बीड - जिल्हा बीड येथे न्यायालयाची स्थापना दिनांक १५ ऑगस्ट २००८ रोजी झाली. तेव्हापासून सदर न्यायालयाचे कामकाज हे खाजगी इमारतीमध्ये चालू आहे. शिरूर येथे न्यायालयासाठी नव्याने भव्य दिव्य व प्रशस्त इमारत बांधण्यात आली असून बांधण्यात आलेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचा उदघाटन समारंभ न्यायमूर्ती राजेंद्र गोविंद अवचट, उच्च न्यायालय मुंबई तथा पालक न्यायमूर्ती बीड न्यायिक जिल्हा यांचे हस्ते संपन्न होणार आहे. या उदघाटन समारंभा प्रसंगी उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती रविंद्र मधुसूदन जोशी, बीड न्यायिक जिल्हा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद लक्ष्मीचंद यावलकर उपस्थित राहणार आहे. कार्यक्रम दिनांक १७ मार्च २०२४ रोजी सकाळी १०-३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास शिरूर व परिसरातील जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक अमितकुमार मनगिरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर शिरूर कासार व ॲड.भारत जायभाये, अध्यक्ष, वकील संघ, शिरूर कासार यांनी केले आहे.

## वैद्यनाथ किड्सचे स्नेहसंमेलन संपन्न

अंबाजोगाई - वैद्यनाथ किड्स चे स्नेहसंमेलन उद्घाटक शिवरुद्र आकुसकर सर माने, काळे,श्रीमंत वैराट यांच्या हस्ते पार पडले. गेल्या अनेक वर्षापासून वैद्यनाथ किड्स आडस येथील शाळेचे स्नेहसंमेलन मोठ्या थाटात पार पडले आहे. सूत्रसंचालन प्रांजल किर्दक श्वेता काळे श्रद्धा काळे योगिता आकुसकर यांनी केले . वैद्यनाथ किड्स चे संचालक ड.पुरुषोत्तम तागड यांनी यावेळी माझ्या शाळेतील विद्यार्थी हाबीड जिल्ह्याचे नाव केल्याशिवाय राहणार नाही अशी यावेळी बोलताना व्यक्त केले स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या खऱ्या गुणांना वाव मिळतो व त्यामध्ये असणाऱ्या गुणामुळेच तो विद्यार्थी भविष्यामध्ये चमकत असतो आपले भवितव घडत्व असतो म्हणून वैद्यनाथ किड्स चे संमेलन हे प्रत्येक वर्षी मोठ्या थाटात पार पडत असते व या ठिकाणी नागरिकांचा विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद असतो. वैद्यनाथ किड्स चे संमेलनाचे आभार प्रदर्शन ड. पुरुषोत्तम तागड सर यांनी केले.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड, बीड

# जिल्ह्यातील विविध देवस्थानांच्या विकासासाठी २४ कोटी ६६ लाखांचा निधी मंजूर -कृषीमंत्री मुंडे

**परळी । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील विविध देवस्थानांचा व तीर्थ स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी आज प्रादेशिक पर्यटन योजनेतून २४ कोटी ६६ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला असून, या निधी खर्चास शासनाच्या वतीने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या रकमेतून परळी मतदारसंघातील विविध देवस्थाने व तीर्थस्थळांच्या विकासासाठी ६ कोटी पेक्षा अधिक निधी मंजूर करण्यात आला असून बीड शहरातील मन्सूर शहावली दर्ग्याच्या विकासासाठी एक कोटी रुपये तसेच बीड शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विकासासाठी एक कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. परळी मतदारसंघ - श्री दत्त मंदिर देवस्थान बागझरी ५० लक्ष, श्री सोमेश्वर देवस्थान घाटनांदुर ५० लक्ष, गणपती देवस्थान बर्दापूर १ कोटी, श्री सोमेश्वर देवस्थान जिरेवाडी ५० लक्ष, पापनशेश्वर मंदिर नाथरा १ कोटी, काळभैरव देवस्थान मांडवा ५० लक्ष, महादेव मंदिर तपोवन ५० लक्ष, पापदंडेश्वर देवस्थान गाडेपिंपळगाव ५० लक्ष, कन्हेरवाडी येथील अष्टविनायक गणपती मंदिरासाठी १ कोटी १६ लक्ष. या व्यतिरिक्त बीड शहरातील मन्सूर शहावली दर्गा १ कोटी, संत भगवान बाबा प्रतिष्ठान १ कोटी, यांसह बीड, आष्टी, केज आदी मतदारसंघात एकूण २४ कोटी ६६ लक्ष रुपयांच्या कामांना निधी उपलब्ध करून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

## महिला धोरणाची अंमलबजावणी अन् मुंडेंनी मंत्रालयातील नावाची पाटी बदलली

**परळी । प्रतिनिधी**



राज्यात नव्याने घोषित करण्यात आलेल्या चौथ्या महिला धोरणातील नियमाची राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी अंमलबजावणी केली असून त्यांनी आपल्या नावामध्ये वडिलांच्या नावाआधी आईचे नाव असलेली पाटी आपल्या मंत्रालयातील दालनामध्ये लावली आहे. त्यामुळे आता धनंजय यांचे संपूर्ण नाव 'धनंजय रुक्मिणी पंडीतराव मुंडे' असे नाव असणारी पाटी आता मंत्रालयात लावण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच महिला व बालविकास मंत्री कु. अदितीताई तटकरे यांच्या माध्यमातून राज्याचे चौथे महिला धोरण नुकतेच घोषित करण्यात आले. या महिला धोरणामध्ये स्त्री-पुरुष समानतेला विशेष महत्त्व देण्यात आले असून आईचे आयुष्यातील स्थान देखील अधोरेखित करण्यात आले आहे. त्यामुळे आता नव्या धोरणानुसार शासकीय कामकाजामध्ये आपले संपूर्ण नाव लिहिताना वडिलांच्या नावा अगोदर आईचे नाव लिहिण्याची प्रथा नव्याने सुरू करण्यात आली असून याची अंमलबजावणी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांच्या मंत्रालयीन दालनात 'धनंजय रुक्मिणी पंडीतराव मुंडे' अशा नावाची पाटी डौलाने उभी आहे!

## अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलनात लिंबागणेशकर सहभागी होणार -डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



देशभरातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनात किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली लिंबागणेशकर दि.१९ मार्च मंगळवार रोजी सकाळी १० वा.पासुन सायं.४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकदिवसीय अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलनात सहभागी होणार असुन तसे निवेदन ईमेलद्वारे राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांना पाठवण्यात आले आहे. शेतकरी आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती असुन अस्मानी व सुलतानी संकटामुळे होणा-या आत्महत्येचे मुळ शेतकरी विरोधी नरभक्षी कायद्यात असुन शेतक-यांच्या आत्महत्येस खालील ३ प्रमुख शेतकरी विरोधी कायदे जबाबदार आहेत. कमाल शेत जमीन धारणा कायदा, भुमी अधिग्रहण कायदा ३)आवश्यक वस्तु कायदा हे जाचक ठरलेले ३ कायदे रद्द करण्यात यावेत. दि.१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण जि.यवतमाळ येथील शेतकरी साहेबराव करपे यांनी शासनाची शेतकरी विरोधी धोरणे व त्यातून शेती व्यवसायात येणारे अपयश हेच सामुहिक मरणकांडाचे मुख्य सुत्र होते. त्यांची पत्नी मालती, विश्रांती (मुलगी),मंगला (मुलगी) ,सारीका (मुलगी ) व भगवान (मुलगा) यांनी वर्धा जिल्ह्यातील दत्तपुर आश्रमात विषयुक्त अन्न देऊन सामुहिक आत्महत्या केली. या घटनेला यावर्षी ३८ वर्षं पुर्ण होत असुन यानिमित्ताने अन्नदात्यासाठी अन्नत्याग हे आंदोलन शेतकरी नेते मा.अमर हबीब यांच्या नेतृत्वात २०१७ पासुन राज्यभर करण्यात येते. लिंबागणेशकर गेल्या ४ वर्षांपासून या आंदोलनात किसानपुत्र डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहभागी होत आहेत.

## महिलांनी एकत्र येणे ही काळाची गरज -प्राजक्ताताई धस

**आष्टी । प्रतिनिधी**

केवळ महिला दिनीच एकत्र न येता आठवड्यातून दोन वेळा तरी एकत्र येऊन विचार विनिमय रोजगार शिक्षण याबाबत महिलांनी चर्चा करणे व केवळ चूल आणि मूल हेच करण्यापेक्षा अन्य महत्वाच्या विषयावर एकत्र येणे ही महिलांसाठी काळाची गरज आहे आष्टी तालुक्यातील खडकत गावांमध्ये पहिल्यांदाच जागतिक दिन अनोख्या उपक्रम आणि प्रथमच साजरा होत आहे असे प्रतिपादन महानंदा दूध महासंघाच्या संचालिका प्राजक्ताताई धस यांनी केले त्या तालुक्यातील खडकत येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित खेळ पैठणीचा जागर स्त्रीशक्तीचा कार्यक्रम प्रसंगी बोलत होत्या. आष्टी तालुक्यातील खडकत येथे ११ मार्च रोजी




महिलांसाठी खेळ पैठणीचा जागर स्त्रीशक्तीचा या कार्यक्रम आयोजित केला होता.सोहळ्याच्या प्रमुख पाहुण्या म्हणून सुलभा हंबर्डे,सायली हंबर्डे,आरती गिरी आदी व्यासपीठावर उपस्थित होत्या.पुढे बोलताना धस म्हणाल्या की ग्रामीण भागातील महिला देखील चांगल्या पद्धतीने उपक्रम राबवू शकतात हे कार्यक्रम करत असताना आणखीही उपक्रम राबवून महिलांना एकत्र करून बचत गटाच्या माध्यमातून रोजगार मिळवण्यासाठी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. केवळ महिला दिनीच एकत्र न येता आठवड्यातून दोन वेळा तरी एकत्र येऊन विचार विनिमय, रोजगार,शिक्षण याबाबत चर्चा करणे गरजेचे आहे.केवळ चूल आणि मूल हेच करण्यापेक्षा अन्य महत्वाचे विषयावर एकत्र येणे ही महिलांसाठी काळाची गरज आहे. त्याचबरोबर स्वतःच्या आरोग्याकडे देखील लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले व खडकत गावी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे आणि आयोजकांचे कौतुक केले. यावेळी आरती गिरी व सायली हंबर्डे यांनी व्यासपीठावर आपले विचार मांडले यावेळी पुजा धोंडे यांनी देखील बचत गटाच्या आणि शासनाच्या योजनांची माहिती दिली या कार्यक्रमाचे तोरडमल सर व कु. ऐश्वर्या कोल्हे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. आयोजित केलेल्या खेळांमध्ये प्रथम क्रमांक रूपाली जेवे यांनी पटकावून मानाची पैठणी मिळवण्याचा बहुमान मिळवला द्वितीय क्रमांक ऐश्वर्या पवार व रूपाली जगताप यांनी विभागून पटकावला तसेच धनश्री मिसेन, मीना गांगर्डे,उषा जेवे,अनिता जेवे,भाग्यश्री जेवे,पुष्पा पवार, अर्चना पवार, शितल पवार,प्रिया जेवे,यांनीही पारितोषिके पटकावली तसेच कु. सिद्धी नवसरे, शिवानी नवसरे, ईश्वरी मगर,सृष्टी मगर,प्रांजल उदमले यांनीही पारितोषिके पटकावली या कार्यक्रमाचे सायली हंबर्डे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले हा कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी शालन भोस्टे,रूपाली पवार,सविता काटे,उषा पवार,पूजा सोले,शारदा उदमले,उषा जगताप,समस्त महिला मंडळ आदींनी उत्कृष्ट नियोजन करुन परिश्रम घेतले.



बीड - दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लक्ष्मणनगर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात याप्रसंगी नवनाथ शिराळ,भाविक भक्त.

## जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सुईंग टेक्नॉलॉजी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी दिपा क्षिरसागर हिने आपले विचार व्यक्त केले. तसेच शिल्पनिदेशक रामदास वैरागे व निकीता गवई यांनीही आपले विचार व्यक्त केले. प्राचार्य पंडीत मुने यांनी अध्यक्षीय समारोप केला. त्यांनी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना महिला दिनाबद्दल माहिती दिली व महिलांनी प्रगती साधण्यासाठी अंधश्रद्धामुक्त जीवन जगावे असे सांगितले.

# पंकजा मुंडे लोकसभा तर खा. प्रितम मुंडे विधानसभा लढवणार ?

**बीड । प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून महाराष्ट्रातील उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. यात काही विद्यमान खासदारांचा पत्ता कट झाला असून, ज्यात बीडच्या खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांचा देखील समावेश आहे. प्रीतम मुंडे यांना डावलून त्यांच्या ज्येष्ठ भगिनी तथा माजी मंत्री पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांना उमेदवारी मिळाल्यानंतर प्रीतम मुंडेंचं काय? अशी देखील चर्चा सुरु झाली आहे. तर, प्रीतम मुंडे यांना विधानसभेत संधी दिली जाणार का? याबाबत देखील चर्चा आहे. प्रीतम मुंडे यांना डावलून बीड लोकसभा मतदारसंघातून पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरु होती. विशेष म्हणजे भाजपकडून झैर करण्यात आलेल्या उमेदवारीत देखील प्रत्यक्षात प्रीतम मुंडे यांना डावलून पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली गेली. त्यामुळे सलग १० वर्ष बीडच्या खासदार राहिलेल्या प्रीतम मुंडे यांच्याबाबत आता भाजप कोणता निर्णय घेणार हे देखील पाहणे महत्वाचे असणार आहे. मुंडे कुटुंबाची बीडच्या राजकारणात मोठी पकड आहे. पंकजा मुंडे यांच्याप्रमाणे प्रीतम मुंडे देखील मागील १० वर्षांपासून जिल्ह्याच्या राजकारणात सक्रीय आहेत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांचा विचार पक्षाकडून केला जाणार का? अशी चर्चा मुंडे समर्थकांमध्ये आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघातून पराभव केला होता. तेव्हापासून पंकजा मुंडे यांना सतत पक्षाकडून डावलण्यात आल्याचा आरोप झाला. प्रत्येक विधानपरिषद आणि राज्यसभेच्या निवडणुकीत पंकजा यांच्या नावाची चर्चा असायची. मात्र, त्यांना उमेदवारी काही मिळाली नाही. अनेकदा पंकजा मुंडे यांनी देखील आपली नाराजी अप्रत्यक्षपणे सभांमधून बोलावून दाखवली होती. असे असतांना आता लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना बीडमधून उमेदवारी देऊन भाजपकडून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न झाला का? आणि पंकजा मुंडे यांची नाराजी दूर झाली का? अशीही चर्चा पाहायला मिळत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com